Impact of retention on unbilled revenue	(184)
Discounting of retention portion of detors	(65)
Fair valuation of Due from Customers	(202)
Fair valuation of financial assets	443
Unwinding on discounting on retention money	234
Actuarial gain/loss taken to OCI	28
Impact of decommissioning obligations on fixed assets	(11)
Fair valuation of derivative conract	(558)
Fair valuation of future foreseeable losses	(21)
Amortisation of transaction costs on borrowings	65
Impact of fair valuation of leases	(20)
Expected credit loss on trade receivables	(9,516)
Fair valuation of corporate guarantee	7
Unwinding of discounts on provisions	(13)
Profit for the year 2015-16 as per Ind AS	(37,632)

For **McNally Bharat** Engineering Company Limited

SRINIVASH SINGH
Managing Director

Kolkata
1st June, 2017

Web : www.mcnallybharat.com **Email : mbecal@mbecl.co.in** **Ph.No. : (033) 6628 1111**

पुखराजजी रांका यांचे निधन

प्रतिनिधी, पुणे

रांका ज्वेलर्सचे (रांका ग्रुप) संस्थापक पुखराजजी रांका यांचे शुक्रवारी येथे निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते.

पुखराजजी यांनी रविवार पेठेत एका छोट्या जागेत सराफी पेढीची मुहूर्तमेढ रोवली. अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांशी ते संबंधित होते. रांका ज्वेलर्सचा शाखा विस्तार, रांका हॉस्पिटल आणि रांका मेडिकल फाउंडेशन अंतर्गत श्री पुखराज नगराज रांका स्कूल ऑफ नर्सिंगच्या उभारणीमध्येही त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या मागे पत्नी नारंगीबाई, बंधू फतेचंद व ओमप्रकाश, पुत्र डॉ. रमेश, अनिल आणि तेजपाल आणि मुलगी नयना परमार असा परिवार आहे.

सावित्रीवरील नवा पूल केवळ १६५ दिवसांत

गडकरींनी आश्वासन पाळले; मुख्यमंत्री फडणवीस, गीतेंच्या हस्ते सोमवारी उद्घाटन

विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली



महाडजवळील सावित्री नदीवरील पूल वाहून गेल्याच्या दुर्घटनेला बरोबर दहा महिने होत असतानाच निविदा निघाल्यापासून सहाच महिन्यांत नवा पूल बांधण्याचा आपला शब्द केंद्रीय रस्ते व राष्ट्रीय महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी पाळला. १८० दिवसांचे उद्दिष्ट असताना १६५ दिवसांमध्ये पूर्ण करण्याची कामगिरी मंत्रालय व राज्याच्या बांधकाम खात्याने केली.

३५ कोटी ७७ लाख रुपये खर्चून बांधलेल्या या नव्या पुलाचे गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गीते यांच्या उपस्थितीत सोमवार, दि. ५ जून रोजी उद्घाटनही होत आहे.

महाडजवळील पनवेल- पणजी या राष्ट्रीय महामार्गावरील (क्रमांक ६६) १९२८मध्ये बांधलेला ब्रिटिशकालीन पूल १ ऑगस्टच्या काळरात्री वाहून गेला होता. त्यामध्ये एकूण ४२ जणांचा बळी गेल्याची अधिकृत माहिती आहे. खरे तर कोसळलेला पूल तोडून तिथे नवा दोनपदरी पूल बांधण्याची प्रक्रिया मंत्रालयाने यापूर्वीच चालू केली होती. त्यासाठी तो पूल पाडण्याचे नियोजन सुरू असतानाच दुर्घटना घडली. गडकरी ६ ऑगस्टला दुर्घटनास्थळी गेले आणि निविदा निघाल्यापासून सहाच महिन्यांत नवा पूल बांधण्याची घोषणा केली. महाराष्ट्राच्या बांधकाम खात्याने २० ऑगस्ट रोजी केंद्राला प्रस्ताव पाठविला. अतिशय जलदगतीने हालचाली करून केवळ अकराच दिवसांमध्ये केंद्राने संमतीची क्लिष्ट प्रक्रिया पूर्ण केली. विशेष म्हणजे संमती मिळाल्याच्या दिवशीच म्हणजे २ सप्टेंबर २०१६ रोजी राज्याच्या बांधकाम खात्याने निविदाही प्रकाशित केली. १ डिसेंबरला निविदा उघडल्या आणि पुण्याच्या टी अँड टी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला त्याचे कंत्राट मिळाले. त्यांना १५ डिसेंबरला कामाचे आदेश (वर्क ऑर्डर) दिले गेले. १५ जून २०१७ पर्यंत म्हणजे सहा महिन्यांत पुलाचे काम पूर्ण करण्याची अटच त्यामध्ये घालण्यात आली. मात्र १८० दिवसांचा कालावधी मिळाला असताना केवळ १६५ दिवसांमध्ये म्हणजे ३१ मे २०१७ रोजीच पूल तयार झाला.

सावित्रीवरील नवा पूल

- एकूण लांबी : २३९ मीटर
- एकूण रुंदी : १६ मीटर (फुटपाथसह तीन पदरी)
- उंची : १०१-०५ मीटर
- खर्च : ३५ कोटी ७७ लाख

महागडी जीवनशैली खासदाराला महागात!

मो ब्ला पेन व ॲपल स्मार्ट घड्याळ वापरल्याबद्दल ऋतुव्रत बॅनर्जीवर मार्क्सवाद्यांचा निलंबनाचा बडगा

विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली



पक्षशिस्त मोडल्याने किंवा पक्षविरोधी कारवायांमुळे लोकप्रतिनिधींना निलंबित केल्याची असंख्य उदाहरणे आठवतील; पण शुक्रवारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने चक्क चंगळवादी व महागड्या जीवनशैलीबद्दल राज्यसभेतील आपल्या खासदारावर तीन महिन्यांसाठी निलंबनाचा बडगा उगारला.

ऋतुव्रत बॅनर्जी हे त्या खासदाराचे नाव. केवळ ३८ वर्षांच्या असलेल्या राज्यसभेतील या अभ्यासू खासदाराचा गुन्हा काय तर त्याने मो ब्ला पेन आणि ॲपल स्मार्ट घड्याळ वापरले... पक्षाकडून दरमहा केवळ सहा हजार रुपयांचे मानधन मिळत असताना एवढी महागडी जीवनशैली कशी काय परवडते, ही या कारवाईमागची मूळ शंका. म्हणून तर लोकसभा खासदार महमद सलीम, केंद्रीय समितीचे सदस्य मदन घोष आणि पश्चिम बंगाल प्रदेश समितीचे सदस्य मृदुल डे यांच्या चौकशी समितीचा अहवाल येईपर्यंत बॅनर्जींना तीन महिन्यांसाठी पक्षातून निलंबित केले. २ ऑगस्टपर्यंत चौकशी अहवाल देण्याची मुदत समितीला दिली आहे.

या सगळ्या प्रकाराची सुरुवात झाली ती फेब्रुवारीमध्ये बॅनर्जी हे सिलिगुडी येथे ईस्ट बंगाल आणि मोहन बागान यांच्यातील फुटबॉल सामना पाहण्यासाठी गेले असताना त्यांचे सुमित तालुकदार या पक्ष कार्यकर्त्याने टिपलेले आणि नंतर सामाजिक माध्यमांवर टाकलेले छायाचित्र. त्यावरून बडेजाव नसलेल्या साध्या वर्तणुकीला अधिक महत्त्व दिले जाणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षामध्ये मोठा गहजब उडाला. पक्षाच्या लोकप्रतिनिधींना मिळणारे सर्व वेतन व भत्ते पक्षाला द्यावे लागतात आणि त्या बदल्यात पक्ष त्यांना दरमहा सहा हजार रुपये मानधन देतो. एवढे 'कमी उत्पन्न' असताना महागड्या वस्तू कशा आल्या, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. त्यातच चिडलेल्या बॅनर्जींनी तालुकदार काम करीत असलेल्या बेंगळूरुमधील कंपनीला पत्र लिहून कारवाईची मागणी केल्याचे उघडकीस आल्याने तर वादाचा भडका उडाला. बॅनर्जी यांच्याकडून खुलासा मागविला, पण त्याने समाधान न झाल्याने निलंबनाची हंगामी कारवाई करण्यात आली.

रिझर्व्ह बँक, नाबार्ड कर्जमाफीला प्रतिकूल

(पान ३ वरून) खडसे यांनीही सरकारकडे केली आहे. कर्जमाफी मिळेल, या आशेवर शेतकरी असल्याने कर्जाची परतफेड जवळपास थांबली असून बहुसंख्य बँकांची कर्जाची परतफेड २५ ते ३० टक्के इतकीच आहे. गेल्या वर्षीच्या खरीप व रब्बी हंगामात सुमारे ५१ हजार कोटी रुपयांचे पीककर्ज वाटप झाले होते. त्यापैकी ३१ मार्चनंतर कर्ज उचल केलेल्या शेतकऱ्यांना कर्ज परतफेडीसाठी ३० जूनपर्यंत मुदत आहे. कर्ज परतफेड होत नसल्याने बँका चिंतेत आहेत .३१ लाख ५७ हजार थकबाकीदार शेतकऱ्यांपैकी अनेकांचे कर्ज २०१२-१३ पासून थकीत आहे. त्यामुळे त्यांना बँकांचे कर्ज मिळू शकत नाही. राज्यात २०१५ मध्ये अनेक गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने राज्य सरकारने गेल्या वर्षी कर्जाचे पुनर्गठन करून तीन ते पाच वर्षांचे हप्ते शेतकऱ्यांना बांधून दिले. त्यावरचे व्याज एक वर्ष सरकारने भरले. या कर्ज पुनर्गठन केलेल्या अनेक शेतकऱ्यांनीही कर्जाचे हप्ते थकविले आहेत. एकदा पुनर्गठन झाल्यावर नियमानुसार पुन्हा पुनर्गठन होऊ शकत नाही. पिकाची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असल्यास किंवा मोठ्या नैसर्गिक आपत्तींमध्ये कर्जाचे पुनर्गठन केले जाते. पण गेल्या वर्षी पाऊस चांगला झाल्याने विक्रमी शेतीमाल उत्पादन झाले आहे. तरीही थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करता येईल का, अशी चाचपणी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी रिझर्व्ह बँक व नाबार्डकडे काही काळापूर्वी केली होती. मात्र नियमांचा अपवाद करून तशी परवानगी देण्यास रिझर्व्ह बँक व नाबार्डने नकार दिल्याचे समजते. परतफेडीचे प्रमाण चिंताजनक असल्याने बँका वाचविण्यासाठी शेतकऱ्यांनी कर्ज फेडावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनीही केले होते. पण ३० जूनपर्यंत मुदत असली तरी मोठ्या प्रमाणावर कर्ज परतफेड होण्याबाबत सरकार साशंकच आहे. त्यामुळे केवळ थकबाकीदारांची कर्जमाफी करायची झाली तरी गेल्या वर्षीच्या ३१ लाख थकबाकीदारांच्या ३० हजार कोटी रुपयांमध्ये वर्षभरात परतफेड न केलेल्या लाखो शेतकऱ्यांची भर पडणार आहे. ही रक्कम २०-३० हजार कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता असून त्याचा तपशील ३० जूननंतरच स्पष्ट होईल, असे सरकारी सूत्रांचे मत आहे. आधीचे कर्ज फेडले नसल्यास पुढील हंगामासाठी नवीन कर्ज घेण्यास शेतकरी पात्र ठरू शकत नाही. या परिस्थितीत सरकारच्या निधीतून शेतकऱ्याचे आधीचे कर्ज फेडणे किंवा नवीन कर्ज देणे, हे दोनच पर्याय शिल्लक राहतात. ज्यात आर्थिक बोजा कमी पडेल, त्याचा विचार राज्य सरकारला करावा लागणार असल्याचे सूत्रांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

शुद्धीपत्रक

निविदा सूचना क्र. Sr.DEE-G-R-OTP-2017-18/05, दिनांकः 18.05.2017

तपशील	पूर्वी प्रकाशित	असे वाचावे
कामाचे नाव	भिलाई मार्शलिंग यार्ड कव्हर शेडचा विस्तार	भिलाई-मेन लाईन इलेक्ट्रिक मल्टिपल शेड पीएच-II मधील सोयीसुविधांमध्ये वाढ

हे शुद्धीपत्रक वरील कामासाठी लागू होईल.
इतर अटी व शर्ती, कंत्राट मूल्य आणि निविदेचे वेळापत्रक यात काहीही बदल होणार नाही.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (जी),
विभागीय रेल्वे व्यवस्थापक (इले-जी) यांचेकरिता/
PR/R/DEE(G)/IP/37 दक्षिण पूर्व मध्य रेल्वे/ रायपूर

स्वच्छ भारत अभियान

Government of India
Department Of Atomic Energy (DAE)
BOARD OF RESEARCH IN NUCLEAR SCIENCES (BRNS)
Dr. K. S. KRISHNAN RESEARCH ASSOCIATESHIP (KSKRA)

The last date for receipt of application for **Dr. K S Krishnan** Research Associateship (KSKRA) 26th Batch against our **Advertisement No. 01/2017(R-IV)** has been extended upto **09/06/2017**.

MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH
Rahuri-413722, Dist. Ahmednagar
Office of The University Engineer,
Phone (02426) 243272, 243235, (Office) 243601 (fax)
Web: www.mpkv.mah.nic.in
e-Mail: uniengineermpkv@gmail.com
No. MPKV/WRK/TC/718/of 2017 Date 02/06/2017

e-TENDER NOTICE No. 3/2017

We invite online e-Tender from reputed & experienced Civil contractors or Companies for Construction of buildings and infrastructure facilities for 'Government College of Agriculture, Muktainagar, Dist. Jalgaon'.
Details of Work as below:

Sr. No.	Name of Work	Approximate Estimated cost (Rs. Lakhs)
1.	Construction of buildings and infrastructure facilities for 'Government College of Agriculture, Muktainagar, Dist. Jalgaon'	2375.62

For detail tender notice and time table please see
https://adf.maharashtra.etenders.in Sd/-
University Engineer, K. V. Rahuri

मुंबई वाहतूक नागरी प्रकल्प (रेल कॉम्पोनण्ट)

बोलींसाठी निमंत्रण (आयएफबी)

आयएफबी क्र. एमआरव्हीसी/डब्ल्यू/१०४/एडीएच-जीएमएन/२०१७/५/आर १

दिनांकित : ३०.५.२०१७

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि., २ रा मजला, स्थानक इमारत, चर्चगेट, मुंबई-४०००२० हे अंधेरी गोरेगाव अनुभाग : पश्चिम रेल्वेच्या अंधेरी- गोरेगाव स्थानकांच्या दरम्यान कामासाठी ६०/५२ किग्रॅ ९०/७२ (यूटीएस) रेल्सचे एसकेव्ही प्रक्रियेद्वारे रेल जॉइंट्सचे थरमिट वेल्डिंगच्या कामाकरिता एक स्तराच्या अंतर्गत एक लिफाफा पद्धतीअंतर्गत ई-बोली मागवीत आहेत. अंदाजे रक्कम : **रु. ६१,९६,३७६/-**, बोली सुरक्षा **रु. १,२४,०००/-** बोलीकरण कागदपत्रे शुल्क : **रु. १०,०००/-**, बोलीकरण कागदपत्रे आणि सदर ई-बोली संबंधित कागदपत्रे आणि ई-बोलीमधील ऑनलाइन सहभाग **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पूर्ण भरलेल्या बोली **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर ३.७.२०१७ रोजी १५.०० वा.पूर्वी इलेक्ट्रॉनिकली सादर करावयात आणि त्याच दिवशी १५.३० वा. एमआरव्हीसी कार्यालय येथे उघडण्यात येतील. बदल/शुद्धिपत्रक जर असल्यास केवळ संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येईल. निविदेच्या तपशिलाकरिता आमचे **www.mrvc.indianrailways.gov.in** आणि **www.ireps.gov.in** या आमच्या संकेतस्थळावर आहे. **संपर्क व्यक्ती : उपमुख्य प्रकल्प व्यवस्थापक III, दूर. क्र. ०२२-२२००७२७०, फॅक्स : ०२२- २२०९६९७२ ई-मेल : dycpm2mrvc@gmail.com**

मध्य रेल्वे

४.६.२०१७ रोजी मेगा ब्लॉक

दुरुस्ती काम करण्यासाठी मध्य रेल्वे ४.६.२०१७ रोजी मेन लाइनवर आणि हार्बर लाइनवर मेगा ब्लॉक करणार आहेत.

ठाणे-कल्याण डाऊन धिम्या मार्गावर सकाळी ११.२० ते दुपारी ४.२० वाजण्याच्या दरम्यान

सकाळी १०.४८ वाजल्यापासून दुपारी ४.२३ वाजेपर्यंत मुलुंड स्थानकातून सुटणाऱ्या डाऊन धिम्या/निम जलदमार्गी गाड्या मुलुंड ते कल्याण स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळविल्या जाऊन ठाणे, दिवा व डोंबिवली स्थानकांवर थांबतील आणि गंतव्यस्थानी नियत वेळेपेक्षा १० मिनिटे उशिरा पोहोचतील.

कळवा, मुंब्रा, कोपर आणि ठाकुर्ली स्थानकांवर डाऊन धिम्या गाड्या उपलब्ध नसतील. या स्थानकांच्या प्रवाशांना कल्याण, डोंबिवली आणि दिवा स्थानकांमार्गे प्रवास करता येईल.

सकाळी १०.२० वाजल्यापासून दुपारी २.४२ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी टर्मिनस मुंबई येथून सुटणाऱ्या डाऊन जलद गाड्या त्यांच्या आपापल्या नियत थांब्यांच्या जोडीला घाटकोपर, विक्रोळी, भांडुप, मुलुंड आणि दिवा स्थानकांवर थांबतील व गंतव्यस्थानी वेळापत्रकापेक्षा १५ मिनिटे उशिरा पोहोचतील.

सकाळी ११ वाजल्यापासून सायं. ५ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी टर्मिनस येथून सुटणाऱ्या/येथे पोहोचणाऱ्या सर्व डाऊन व अप धिम्या गाड्या गंतव्यस्थानी वेळापत्रकापेक्षा १० मिनिटे उशिरा पोहोचतील.

कुर्ला-वाशी अप आणि डाऊन हार्बर मार्गांवर
सकाळी ११.१० वाजल्यापासून दुपारी ४.१० वाजेपर्यंत

सकाळी १०.३५ वाजल्यापासून दुपारी ३.३७ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी टर्मिनस येथून पनवेल/बेलापूर/वाशीकरिता सुटणाऱ्या डाऊन हार्बरमार्गी गाड्या आणि सकाळी १०.२० ते दुपारी ३.४८ वाजण्याच्या दरम्यान पनवेल/बेलापूर/वाशी येथून छत्रपती शिवाजी टर्मिनसकरिता सुटणाऱ्या अप हार्बरमार्गी गाड्या तात्पुरत्या रद्द राहतील.

तथापि, ब्लॉक कालावधीदरम्यान छत्रपती शिवाजी टर्मिनस-कुर्ला आणि वाशी-पनवेल अनुभागांवर विशेष लोकल गाड्या चालविण्यात येतील.

सकाळी १० वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत हार्बरमार्गी प्रवाशांना ट्रान्स-हार्बर/मेन लाइनमार्गेसुद्धा प्रवास करता येईल.

या ब्लॉक्समुळे, उपनगरी गाड्यांमध्ये नेहमीपेक्षा जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. प्रवाशांनी कृपया प्रवास करताना कोणतीही जोखीम पत्करू नये. तसेच कृपया फुटबोर्डवरून, गाडीच्या टपावरून प्रवास करणेसुद्धा टाळावे व अति गर्दी असलेल्या गाडीत चढू नये. प्रवाशांनी कृपया गैरसोय सहन करून रेल्वे प्रशासनास सहकार्य द्यावे. १९९

उज्ज्वल भविष्याकरिता कार्यरत

भारत सरकार, संरक्षण मंत्रालय
युनिट/डेपो : सेंट्रल ऑर्डिनन्स डेपो, मुंबई

भरती सूचना

१. खालील पदांसाठी पात्र भारतीय नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. पे स्केल आणि पदांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अनु. क्र.	पदांचे स्वरूप	पदांची संख्या								पे स्केल
		यूआर	ओबीसी	एससी	एसटी	एकूण	ईएसएम	एमएसपी	पीएच	
(ए)	एलडीसी	०३	०२	-	-	०५	-	-	०१ (एचएच)	₹ ५,२००-२०२०० + ग्रेड पे रु. १९००/-
(बी)	सफाईवाला	०१	-	-	-	०१	-	-	-	₹ ५,२००-२०२०० + ग्रेड पे रु. १८००/-
(सी)	मेसेंजर	-	०१	-	-	०१	-	-	-	₹ ५,२००-२०२०० + ग्रेड पे रु. १८००/-
(डी)	ट्रेड्समन मेट	०१	०१	-	-	०२	-	-	-	₹ ५,२००-२०२०० + ग्रेड पे रु. १८००/-
(ई)	पेंटर	-	०१	-	-	०१	-	-	-	₹ ५,२००-२०२०० + ग्रेड पे रु. १९००/-

पीएच (एचएच) चे पद (म्हणजेच कर्णबधिरता) आणि माजी सैनिक प्रथम सादर करू शकतात आणि संबंधित श्रेणींमध्ये सामावून घेण्यात येईल.

२. अर्ज स्वीकृतीसाठी शेवटचा दिनांक हा रोजगार वार्ता (प्रसिद्धीचा दिनांक वगळता) मध्ये जाहिरातीच्या प्रसिद्धीपासून २१ दिवसांनंतर असेल. जर उमेदवार आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, सिक्कीम, लडाख, जम्मू-काश्मीरच्या उपविभागांमधील, हिमाचल प्रदेशच्या चंबा जिल्ह्याच्या पांगी उपविभागाच्या लाहूल आणि स्पिटी जिल्हा, अंदमान आणि निकोबार बेटे आणि लक्षद्वीप या ठिकाणचे असल्यास त्यांच्याकरिता अर्जाच्या सादरीकरणाचा शेवटचा दिनांक जाहिरात प्रसिद्धीपासून २८ दिवसांनी असेल.

३. तपशीलवार पात्रता निकष आणि आवेदन अर्ज **www.indianarmy.nic.in** व **www.ncs.gov.in** वर उपलब्ध आहे.

४. संकेतस्थळावरील अर्जांच्या स्वरूपाशी मिळते-जुळते नसल्यास ते स्वीकारण्यात येणार नाही. डीएव्हीपी १०२०२/११/००२८/१७१८

Camlin KOKUYO

कोकुयो कॅम्लिन लिमिटेड

CIN: L24223MH1946PLC005434

नोंदणीकृत कार्यालय: हिल्टन हाऊस, ४८/२, सेंन्ट्रल रोड, एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३. **टेलि:** ९१-२२-६६५५ ७०००, **फॅक्स:** ९१-२२-२८३६ ६५७९
ई-मेल: investorrelations@kokuyocamlin.com

नोटीस

२७ एप्रिल २०१७ तारखेच्या नोटिशीमध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे कामकाज पार पाडण्यासाठी कंपनीच्या सभासदांची ७० वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) ही वालचंद हिराचंद हॉल, आयएमसी इमारत, इंडियन मर्चन्ट चेंबर मार्ग, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथे बुधवार, २८ जून २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल.

ज्या सभासदांचे ईमेल अॅड्रेसेस हे डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे/कंपनी निबंधकाकडे आणि भाग हस्तांतरण एजन्टकडे नोंदणीकृत आहेत, त्या सभासदांना वित्तीय वर्ष २०१६-१७ चा वार्षिक अहवाल १ जून २०१७ ई-मेल करण्यात आलेला आहे आणि ज्या सभासदांचे ईमेलला अॅड्रेसेस नोंदणीकृत नाहीत, त्यांना मान्यता प्राप्त मार्गाने सदर अहवाल दरम्यान १ जून २०१७ आणि २ जून २०१७ रोजी पाठविण्यात आलेला आहे. २०१६-१७ चा वार्षिक अहवाल आणि एजीएमची नोटीस हे कंपनीच्या www.kokuyocamlin.com ह्या वेबसाइटवरही उपलब्ध आहेत.

कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १०८ तसेच कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० आणि सेबी (सूचीकरण आबंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ ह्यांच्या अनुरोधाने, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएलद्वारे) प्रदान करण्यात आलेल्या, एजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त अशा ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा ('दुरस्थ ई-मतदान') वापर करून, एजीएमच्या नोटिशीमध्ये मांडण्यात आलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्याची सुविधा सभासदांना प्रदान करण्यात येत आहे आणि अशा मतदानाद्वारे कामकाज पार पाडण्यात येऊ शकते. ई-मतदान सुविधा उपलब्ध नसणाऱ्या सभासदांना, एजीएमच्या नोटिशीमध्ये मांडण्यात आलेल्या ठरावांच्या संबंधात लिखित स्वरूपात आपली सहमती किंवा असहमती दर्शविता येण्यासाठी, कंपनीने वार्षिक अहवालामध्ये मतपत्रिकादेखील जोडलेली आहे.

सभासद हे ई-मतदान किंवा मतपत्रिका ह्यांपैकी केवळ एकाच पद्धतीचा वापर करू शकतील. सभासदांनी दोन्ही पद्धतीने मतदान करण्याच्या बाबतीत, ई-मतदानाद्वारे करण्यात आलेले मतदान ग्राह्य धरले जाईल आणि मतपत्रिकेद्वारे करण्यात येणारे मतदान अग्राह्य मानण्यात येईल.

ई-मतदानाला रविवार, २५ जून २०१७ रोजी (सकाळी ९.०० आयएसटी) सुरूवात होईल आणि ते मंगळवार, २७ जून २०१७ रोजी (संध्याकाळी ५.०० आयएसटी) समाप्त होईल. ह्या कालावधीदरम्यान, सभासद इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचे मतदान पार पाडू शकतील. त्यानंतर एनएसडीएलद्वारे ई-मतदान मॉड्यूल अकार्यान्वित करण्यात येईल. कट-ऑफ तारखेला म्हणजेच २१ जून २०१७ रोजी कंपनीचे सभासद असणारी कोणतीही व्यक्ती ही दुरस्थ ई-मतदान करण्याची आणि ७० व्या एजीएममध्ये मतदान करण्याची सुविधा प्राप्त करण्यासाठी हक्कदार असेल.

एजीएम नोटीस पाठविण्यात आल्यानंतर समभाग संपादन केलेली व कंपनीचे सभासद झालेली आणि कट-ऑफ तारखेला भागधारणा करणारी कोणतीही व्यक्ती ही evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतील. तथापि, दुरस्थ ई-मतदानासाठी एनएसडीएलकडे व्यक्तीची अगोदरच नोंदणी झालेली असल्यास, मतदान करण्यासाठी विद्यमान युझर आयडी आणि पासवर्ड ह्यांचा वापर करण्यात येऊ शकतो.

एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि अगोदरच दुरस्थ ई-मतदानाद्वारे किंवा मतपत्रिकेद्वारे मतदान न केलेले सभासद हे एजीएममध्ये आपला हक्क बजावू शकतील. एजीएमच्या आधी दुरस्थ ई-मतदानाद्वारे किंवा मतपत्रिकेद्वारे ज्या सभासदांनी मतदान केलेले आहे, ते एजीएमला उपस्थितदेखील राहू शकतील परंतु ते पुन्हा मतदान करण्यासाठी हक्कदार असणार नाहीत.

दुरस्थ मतदान, मतपत्रिका आणि मतदान संबंधी काही शंका असल्यास सभासदांकडून नेहमी विचारले जाणारे प्रश्न किंवा सभासदांकरीता इव्होटींग मॅन्युअल या सभासदांकरीता उपलब्ध असलेल्या एनएसडीएलच्या वेबसाईटच्या www.evoting.nsdl.com मधील डाऊनलोड विभागांतून माहिती घेता येईल किंवा सभासदासाठीची ई-मतदान पुस्तिका ह्यांचा संदर्भ घेऊ शकतील किंवा श्री राजीव रंजन, मेसर्स नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेडचे सहाय्यक व्यवस्थापक, नियुक्त ईमेल आयडी rajiv@nsdl.co.in, evoting@nsdl.co.in किंवा ०२२ २४९९ ४७३८/ १८०० २२२ ९९० या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधा. इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाशी संबंधित तक्रारींची देखील माहिती दिली जाईल.

वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी कंपनीची सभासदांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तिका हे २४ जून २०१७ ते २८ जून २०१७ (दोन्ही दिवस समाविष्ट) ह्या कालावधीमध्ये बंद राहतील.

मंडळाच्या आदेशानुसार
कोकुयो कॅम्लिन लिमिटेड करिता

रविंद्र दामले
स्थळ : मुंबई **उपाध्यक्ष (कॉरपोरेट) आणि**
दिनांक : २ जून, २०१७ **कंपनी सचिव**

(मूळ इंग्रजी मसुद्याचे हे भाषांतर असून सर्व विवादामध्ये मूळ इंग्रजी मुसदा प्रमाण मानण्यात येईल.)

बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. उपमुख्य अभि./एसपी/१७१४/पी व डी/निविदा क्र. २०१७-१८/०१ आणि ०२ (मायक्रो)/ई-निविदा सूचना क्र. १/

दि. १.६.२०१७

ई-निविदा सूचना

विभाग	मुख्य अभियंता (मलनिस्सारण प्रकल्प)
उप विभाग	उप मुख्य अभि. (मलनिस्सारण प्रकल्प) पी आणि डी
निविदा क्र.	**उप मु. अ./एस.पी./२०१७-१८/ ०१/ मायक्रो/पी व डी/ ई- निविदा**
बोली क्र.	७१०००९९८४०
विषय	मुंबईमधील शहर आणि पश्चिम उपनगर क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी मायक्रो टनेलिंग पद्धतीद्वारे १००० मिमी आणि १२०० मिमी व्यास मीटरची आरसी पाइप (एनपी-४ वर्ग आणि वरील) मलनिस्सारण लाइनची तरतूद आणि टाकणे.
निविदा क्र.	**उप मु. अ./एस.पी./२०१७-१८/०२/ मायक्रो/पी व डी/ ई- निविदा**
बोली क्र.	७१०००९९८४१
विषय	मुंबईमधील पश्चिम आणि पूर्व उपनगर क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी मायक्रो टनेलिंग पद्धतीद्वारे ८०० मिमी, १००० मिमी, १२०० मिमी आणि १६००/१८०० मिमी व्यास मीटरची आरसी पाइप मलनिस्सारण लाइनची तरतूद आणि टाकणे.
निविदा विक्री	३.६.२०१७ रोजी स. ११.०० वा.पासून ते २७.६.२०१७ रोजी सायं. १२.०० वा.पर्यंत.
एमसीजीएम पोर्टल	**http:portal.mcgm.gov.in**
सदर निविदा सूचनेच्या संदर्भात अधिक कोणत्याही माहितीसाठी तुम्ही संपर्क करू शकता.	ए.ओ. (एस.पी.) पी व डी
ए. नाव	श्रीमती. लतिका एस. पिसाळ ए. ओ. (एस. पी.) पी व डी
बी. दूरध्वनी क्र. (कार्यालय)	०२२ २४९५८००१/ १०१ विस्ता. ७८१३
सी. मोबाइल क्र.	९९६९०१८०६६
डी. ई-मेल आयडी	**dychespnpd@gmail.com**

सही/- उप मु. अभि. (मलनिस्सारण प्रकल्प)
पीआरओ/३५९/जाहि./१७-१८ नियोजन आणि आरेखन

पाणी वाचवा पाणी मौल्यवान आहे

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

(मध्यवर्ती कार्यालय)

(महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ चे कलम ६(१) अन्वये स्थापिलेले)
कार्यालय : डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, सानपाडा, नवी मुंबई-४०० ७०५.
दूरध्वनी: ०२२-२७७५१३८५/२७७५१३८६ फॅक्स: ०२२-२७७५१३८७ संकेतस्थळ: www.securityguardsboard.in ई-मेल: sgb_sanpada@yahoo.co.in

संदर्भ क्र. सुरमं/अध्यक्ष/२०१७-२०१७ **दिनांक : ०२.०६.२०१७**

जाहीर सूचना
सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्यामध्ये वाढ करणेबाबत

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा ह्या मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विविध कामगार संघटना यांनी सध्याच्या महागाईचा व राहणीमानाचा विचार करता, सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्या विद्यमान वेतन व भत्ते यामध्ये वाढ/सुधारणा करावी अशी मागणी केलेली आहे व मंडळाकडे या आशयाचे प्रस्ताव/निवेदने सादर केलेली आहेत. यापूर्वी मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्त्यांमध्ये दि. १ एप्रिल २०१५ पासून वेतनवाढ करण्यांत आलेली होती व सदर वेतनवाढीस २ वर्षे पूर्ण झालेली असल्याने सुरक्षा रक्षक संघटनांनी माहे जानेवारी २०१७ पासून वेतन व भत्त्यामध्ये वाढ करण्यांत यावी अशी विनंती केलेली आहे.

सुरक्षा रक्षकांना मिळणारे सध्याचे विद्यमान वेतन व भत्ते हे मागील काळात वाढलेला महागाई निर्देशांक, राहणीमान इ. बाबींचा विचार करुन वेतन व भत्ते पुनःनिर्धारीत करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधीन आहे.

खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० मधील उपखंड २ मधील तरतुदीनुसार नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतनाचे दर, भत्ते आणि अतिकालीक काम सेवेच्या इतर शर्ती निश्चित करण्याच्या किंवा त्यात सुधारणा करण्याच्या किंवा फेरबदल करण्याच्या प्रयोजनासाठी मंडळातील नोंदीत मुख्य मालक/नियोक्ता व त्यांच्या मालक संघटना (Association of Principal Employers) आणि त्यांच्याकडे मंडळातील कार्यरत नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या कामगार संघटना तसेच मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक व इतर सर्व संबंधितांच्या सूचना व हरकती मागवून सदर वेतनाचे दर/भत्ते व सेवा शर्ती निश्चित करण्याचे सुरक्षा रक्षक मंडळास अधिकार आहेत. त्यानुसार मंडळाने दि. १ जून २०१७ पासून पुढील ३ वर्षाकरीता (दि. १ जून २०१७ ते दि. ३१ मे २०२० या कालावधीकरीता) मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रस्तावित मूळ वेतन व इतर भत्ते पुनःनिर्धारीत करण्याचे निश्चित केले असून प्रस्तावित वेतन व भत्त्यांचे दर पुढीलप्रमाणे असतील.

अ. क्र.	हुद्दा	मूळ वेतन रुपये	विशेष भत्ता/ महागाई भत्ता (रु)	घरभाडे भत्ता (मूळ वेतन व म.भत्त्यावर २०%) (रु)	प्रवास भत्ता (रु)	शैक्षणिक भत्ता (रु)	रजाकालीन प्रवास भत्ता (रु)	धुलाई भत्ता (रु)	एकूण वेतन व भत्ते रुपये	लेव्ही: मूळ वे+म.भ. ४६.७५%	लेव्ही: इतर भत्ते ४.७५%	एकूण वेतन (रु)
१	सुरक्षा रक्षक	७४००/-	३२५६.२०	२१३२/-	१५००/-	१३००/-	५०/-	९००/-	१६५३८.२०	४९८२/-	२३७/-	२१७५७.२०
२	मुख्य सुरक्षा रक्षक	७६७५/-	३२५६.२०	२१८६/-	१५००/-	१३००/-	५०/-	९००/-	१६८६७.२०	५१११/-	२३९/-	२२२१७.२०
३	सुरक्षा पर्यवेक्षक	८३७५/-	३२५६.२०	२३२६/-	१५००/-	१३००/-	५०/-	९००/-	१७७०७.२०	५४३८/-	२४६/-	२३३९१.२०
४	सहा.सुरक्षा अधिकारी	८६००/-	३२५६.२०	२३७२/-	१५००/-	१३००/-	५०/-	९००/-	१७९७८.२०	५५४३/-	२४८/-	२३७६९.२०
५	सुरक्षा अधिकारी	९०५०/-	३२५६.२०	२४६२/-	१५००/-	१३००/-	५०/-	९००/-	१८५१८.२०	५७५३/-	२५२/-	२४५२३.२०
६	मुख्य सुरक्षा अधिकारी	९५००/-	३२५६.२०	२५५२/-	१५००/-	१३००/-	५०/-	९००/-	१९०५८.२०	५९६४/-	२५७/-	२५२७९.२०

प्रस्तावित वेतन व भत्त्यांचे दरांबाबत मंडळातील नोंदीत मुख्य मालक/नियोक्ता व त्यांच्या मालक संघटना (Association of Principal Employers) आणि त्यांच्याकडे मंडळातील कार्यरत नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या कामगार संघटना तसेच मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक व इतर सर्व संबंधितांच्या कांही सूचना/हरकती असल्यास, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून **१० दिवसांचे आत** मंडळाकडे लेखी स्वरुपात पाठविण्याची विनंती आहे. सदर सूचना/हरकती यांचा सांगोपांग विचार करून सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्या वेतनात सुधारणा/वाढ करण्याबाबत अंतिम निर्णय मंडळ घेईल. विहित केलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकती यांचा विचार मंडळ करणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(रविकुमार पाटणकर)
सचिव
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

सानपाडा, नवी मुंबई
दिनांक : ०२.०६.२०१७
*Local/2016/DKG/Notice Wage Revision 2017